**ठळक बातम्या**

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी महायुतीच्या जागावाटपाचं चित्र येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल, असं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- बिहारमधे सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग

- छत्तीसगडमधे सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार

- कोलकाता कसोटीत भारताचा दक्षिण आफ्रिकेकडून ३० धावांनी पराभव

**आणि**

- निफाडमध्ये पारा ८ अंशावर, येत्या दोन दिवसांत मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महायुतीच्या जागावाटपाचं चित्र येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला आहे.छत्रपती संभाजीनगर इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. या निवडणुकांच्या जागावाटपाचे निर्णय जिल्हास्तरावर होतात, त्यामुळे काही ठिकाणी महायुती झाली आहे, काही ठिकाणी दोन पक्ष एकत्र आले आहेत, तर काही ठिकाणी कोणत्याही पक्षांमध्ये युती झालेली नाही. यावर चर्चा सुरू आहे, असंही ते म्हणाले. महानगरपालिकांच्या निवडणुकीत मात्र शक्य तिथं युती होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचा पूर्णाकृती पुतळा आणि परिसर सुशोभीकरणाच्या कामाचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी महाराष्ट्राच्या जडणघडणीत वसंतरावांचं योगदान अधोरेखित करताना ते म्हणाले,

***होल्ड… बाईट- देवेंद्र फडनवीस***

फडनवीस यांनी आज चिकलठाणा इथं भाजपाच्या निवडणूक कार्यालयाचं उद्घाटन, क्रांतीचौक इथं स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचं लोकार्पण, कमल तलाव

पुनरुज्जीवनाच्या कामाचं लोकार्पण, तसंच सातारा परिसरातल्या श्रीयश आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालय, तसंच संशोधन केंद्राच्या नव्या इमारतीचं उद्घाटनही केलं.

<><><><><>

गोंदिया जिल्ह्यातल्या नगर परिषद आणि नगर पंचायतीची निवडणूक स्वबळावर लढणार असल्याची घोषणा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार प्रफुल पटेल यांनी आज गोंदियात केली. गोंदिया जिल्ह्यात गोंदिया आणि तिरोडा या दोन नगर परिषदा, तसंच गोरेगाव आणि सालेकसा या नगर पंचायतीच्या निवडणुका होत आहेत. त्यासाठी उमेदवारांच्या नावाची घोषणा आज रात्री उशिरापर्यंत केली जाईल, असं पटेल यांनी बातमीदारांना सांगितलं.

<><><><><>

नंदुरबार जिल्ह्यामधल्या नंदुरबार, नवापूर, शहादा आणि तळोदा या नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदासाठी १४ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून नगरसेवक पदासाठी १४६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. नंदुरबार ४१, शहादा २९, तळोदा २१ आणि नवापूर नगरपरिषदेच्या २३ जागांसाठी निवडणूक होणार आहे. राज्यातल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी दोन डिसेंबरला मतदान होणार आहे.

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड विजयानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं राज्यात सरकार स्थापन करण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. सरकार स्थापनेसाठी राजकीय हालचालींनी वेग घेतला आहे. या घडामोडींबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून :

- **- VC - -**

*(बिहार विधानसभा निवडणुकांमधल्या दणदणीत विजयानंतर केंद्रीय मंत्री आणि लोक जनशक्ती पार्टी (राम विलास) चे अध्यक्ष चिराग पासवान, हिंदुस्थानी अवाम मोर्चाचे अध्यक्ष संतोष सुमन यांच्यासह एनडीएच्या घटक पक्षांच्या नेत्यांनी सत्ता स्थापनेबाबत चर्चा करण्यासाठी काल पाटणा इथं जदयू चे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांची भेट घेतली. जदयू चे कार्यकारी अध्यक्ष संजय झा आणि केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांनीही*

*काल संध्याकाळी नवी दिल्लीत भाजपाचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली.*

*उद्या, जदयू विधिमंडळ पक्षाची बैठक होणार असून, यावेळी पक्षाचे अध्यक्ष नितीश कुमार यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली जाईल.*

*एनडीएचे पाचही घटक पक्ष आपापल्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्यांची निवड करण्यासाठी स्वतंत्र बैठका घेतील, त्यानंतर एक संयुक्त बैठक आयोजित केली जाईल, यावेळी एनडीएच्या नेत्याची निवड केली जाईल.)*

**<><><><><>**

राज्यातल्या शाळा आणि महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या नवीन बसगाड्या उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. शिक्षण संस्था आणि विद्यार्थ्यांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाचा आनंद घेता यावा हा यामागचा उद्देश आहे. याअंतर्गत एसटीच्या राज्यभरातल्या २५१ आगारांमधून दररोज ८०० ते हजार गाड्या उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आज राष्ट्रीय पत्रकारिता दिन. १९६६मधे या दिवशी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना झाली होती. वर्तमानपत्रं आणि प्रसारमाध्यमांवर नैतिकदृष्ट्या देखरेख ठेवण्याचं काम ही संस्था करते. पत्रकारितेतल्या उत्कृष्ट कामगिरीसाठीचे राष्ट्रीय पुरस्कार या दिवशी प्रदान करण्यात येतात.

नवी दिल्ली इथं राष्ट्रीय पत्रकारिता दिनानिमित्त आयोजित समारंभाला माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल मुरुगन, उपस्थित राहिले. प्रेस कौन्सिलच्या अध्यक्ष न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यावेळी उपस्थित होत्या. लोकशाहीमध्ये पत्रकारितेची भूमिका महत्त्वाची असल्याचं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले.

आजच्याच दिवशी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियानं पत्रकारितेमध्ये जागल्याची भूमिका घेतली, आणि पत्रकारितेचं स्वातंत्र्य जपणं, आणि भारतीय पत्रकारितेचा दर्जा उंचावणं अशी दुहेरी जबाबदारी स्वीकारली, असं न्यायमूर्ती रंजना देसाई यांनी सांगितलं.

<><><><><>

रसायनांच्या अतिवापरामुळे शेतजमीन ओसाड झाली असून विषमुक्त अन्ननिर्मितीसाठी नैसर्गिक शेतीला पर्याय नाही, असं राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत राजभवनात संकल्प फाउंडेशनतर्फे 'नैसर्गिक कृषी - अनुपम भारतीय वारसा' या विषयावर आयोजित चर्चासत्रात बोलत होते. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नैसर्गिक शेतीला चालना द्यावी, असं आवाहनही राज्यपालांनी केलं.

<><><><><>

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. यात दोन महिलांचा समावेश आहे. या तिघांवर १५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. तुमालपाड भागातल्या जंगलात नक्षलवाद्यांचा वावर असल्याची खबर मिळाल्यानंतर जिल्हा राखीव दलाच्या एका पथकानं या भागात शोधमोहीम सुरू केली. सुरक्षा दलं आणि नक्षलवाद्यांमध्ये आज सकाळपासून चकमक सुरु होती. चकमकीनंतर या तिघांच्या मृतदेहांबरोबरच एक रायफल, बीजीएल लॉन्चर्स, इतर शस्त्रास्त्रं आणि स्फोटकं सुरक्षा दलांनी हस्तगत केली.

<><><><><>

कोलकाता इथं झालेला पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं आज तिसऱ्याच दिवशी भारतावर ३० धावांनी विजय मिळवला, आणि दोन सामन्यांच्या या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

आज दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डाव १५३ धावांत आटोपला. कर्णधार बवुमा ५५ धावांची झुंजार खेळी करुन नाबाद राहिला. भारतातर्फे रविंद्र जडेजानं चार, सिराज आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी २, तर बुमरा आणि अक्सर पटेल यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

भारताला दुसऱ्या डावात विजयासाठी १२४ धावा करायच्या होत्या. मात्र भारताच्या फलंदाजांनाही खेळपट्टीवर तग धरता आली नाही, आणि भारताचा संपूर्ण संघ केवळ ९३ धावा करून तंबूत परतला. वॉशिंगटन सुंदर यानं सर्वाधिक ३१ धावा केल्या.

या सामन्यात आठ बळी घेणारा सायमन हार्मर सामनावीर ठरला.

मालिकेतला दुसरा आणि अखेरचा सामना येत्या २२ तारखेपासून गुवाहाटी इथं होणार आहे.

<><><><><>

श्रवणदोष असलेल्यांसाठीच्या डेफलिंपिक्स २०२५ स्पर्धेत भारताच्या धनुश श्रीकांत यानं एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. जपानमध्ये टोक्यो इथं सुरू असलेल्या या स्पर्धेत त्यानं २५२ पूर्णांक २ दशांश गुण नोंदवत नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. भारताचाच मोहम्मद वनिया यानं २५० पूर्णांक १ दशांश गुण मिळवून रौप्यपदक मिळवलं. महिलांच्या एअर रायफल प्रकारात महित संधू हिनं रौप्य, तर कोमल वाघमारे हिनं कांस्यपदकाची कमाई केली.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाच्या निवडणुकीत मंत्री नरहरी झिरवाळ आणि माजी आमदार जे पी गावित यांच्या नेतृत्वाखालच्या पॅनलचा विजय झाला. महामंडळाच्या सतरा जागांसाठी १४ नोव्हेंबरला मतदान झालं होतं.

<><><><><>

दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ १० नोव्हेंबर रोजी झालेल्या स्फोटाचे धागेदोरे मिळवण्याचं काम तपास यंत्रणा करत आहेत. देशभरातल्या विविध ठिकाणी अद्याप शोधमोहिमा आणि तपासण्या सुरू आहेत. दिल्ली गुन्हे शाखेनं आज अल फलाह विद्यापीठाविरोधात फसवणूक आणि बनावट कागदपत्रं तयार केल्याप्रकरणी दोन एफआयआर दाखल केले.

<><><><><>

मुंबईच्या नौदल गोदीवर दहशतवादी हल्ला होणार असल्याचा फोन केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. गोदीचेच कर्मचारी असणाऱ्या या दोघांपैकी एकानं दारूच्या नशेत मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला फोन केला आणि नौदल गोदीवर हल्ला होणार असल्याची माहिती आपल्याला दुसऱ्या कुणा व्यक्तीकडून मिळाल्याचा दावा केला.

<><><><><>

नाशिकमध्ये पारा आणखी घसरला असून निफाडमध्ये ८ अंश सेल्सिअस इतकं नीचांकी तापमान नोंदवलं गेलं. नाशिक शहरात आज १० पूर्णांक १ दशांश अंश सेल्सीअस इतकं तापमान नोंदवलं गेलं. काल १० पूर्णांक ३ अंश सेल्सीअस किमान तापमानाची नोंद झाली होती. विशेष म्हणजे कमाल तापमान देखील कमी झालं आहे. त्यामुळे गारठा वाढला आहे.

गेल्या २४ तासात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली. येत्या दोन दिवसांत मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//